| | |
|---|---|
| MHKO070006952021 | **<u>रे.क.नं.११६/२०२१</u>**<br>हणमंत अजित राऊत<br>विरुध्द<br>सुनिल बापू घूलांडे आणि इतर |

<u>नि.क्र.५४ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र.१ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळणेविषयी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी त्यांचे अर्जात थोडक्यात असे कथन केले आहे की, यातील प्रतिवादी क्र.१ सुनिल बापू घुलांडे हे दि.१३/०६/२०२३ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमुद प्रमाणे सरळ व कायदेशीर वारस आहेत. सबब, अर्ज मंजूर करणेविषयी विनंती वादी यांनी केलेली आहे.

०३. विरुध्द बाजूने सदर अर्जाच्या पाठीमागेच आपले म्हणणे देवुन कथन करण्यात आले आहे की, प्रतिवादी क्र.१ हे मयत झाले आहेत ही बाब खरी आहे. परंतू त्यांचे वारसांचे बाबत प्रतिवादी यांना संपुर्ण माहिती नाही. वादी यांचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा हा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. दावा हा स्थावर मिळकतीबाबत आहे. प्रतिवादींतर्फे प्रस्तुत प्रतिवादी क्र.१ हे मयत नसलेबाबत वाद उपस्थीत केलेला नाही. प्रतिवादी क्र.१ चे वारस म्हणून त्यांना दावा चालविणेचा अधिकार असलेने दावेत त्यांना तांत्रीकदृष्ट्या मयत प्रतिवादीच्या समोर रेकॉर्डवर घेणे न्यायाचे हेतुस्तव आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा गुणदोषावर निकाली निघणे हे अत्यंत आवश्यक आहे. वादीतर्फे नि.क्र.५३ ला प्रतिवादी क्र.१ विरुध्द झालेला अबेटमेंट सेट असाईड होणेसाठी अर्ज व विलंब माफीचा अर्ज दाखल करण्यात आला होता तो खर्चासह मंजुर करणेत आलेला आहे. त्यामुळे अर्जातील कथन व कारण पाहता प्रस्तुतचा अर्ज हा मंजुर होण्यास पात्र आहे. करिता खालील आदेश पारीत

करण्यात येतो–

**– <u>आदेश</u> –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.५४) हा नि.क्र.५३ वरील खर्चाची पुर्तता झाल्यास मंजुर समजण्यात यावा.

२. नि.क्र.५३ वरील आदेश या आदेशासोबत वाचण्यात यावेत.

३. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.05.06 17:25:12 +0530

दि.०६/०५/२०२६ **(अ. त्रिं. मनगिरे)**

जयसिंगपूर. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 06/05/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 06/05/2026. |
| Judgment/order uploaded on | 06/05/2026. |